# BDC LIBRARY

## New Paper Clipping

*A.Y. 2024-2025*

# देसाई महाविद्यालयास उत्कृष्ट एनएसएस युनिट पारितोषिक

## डॉ. जी. एस. पट्टेबहादूर उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्काराने सन्मानित

**वार्ताहर**
पाटण

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर राष्ट्रीय सेवा योजना २०२२-२३ साठीचे उत्कृष्ट राष्ट्रीय सेवा योजना युनिट म्हणून येथील बाळासाहेब देसाई महाविद्यालयास जिल्हास्तरीय पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच अर्थशास्त्र विभागातील प्रा. डॉ. गजानन पट्टेबहादूर यांना त्यांच्या राष्ट्रीय सेवा योजनेमधील योगदानाबद्दल शिवाजी विद्यापीठाच्या वतीने कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते सातारा जिल्हास्तरीय उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे, एनएसएस विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले उपस्थित होते.

बाळासाहेब देसाई महाविद्यालयाने राष्ट्रीय सेवा योजनाच्या माध्यमातून अनेक सामाजिक उपक्रम राबवले आहेत. युवकांच्या मनामध्ये श्रमसंस्कार रुजवत संस्कारशील नागरिक बनविण्याचा प्रयत्न करून शिवाजी विद्यापीठात आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे. वृक्षारोपणापासून रक्तदान शिबिर ते वनराई बंधारे असे अनेक सामाजिक उपक्रम घेऊन विद्यापीठाच्या विविध योजना लोकांपर्यंत पोहोचवल्या आहेत.

या उपक्रमांची दखल घेऊन विद्यापीठाकडून सन २०२२-२३ चा उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी म्हणून डॉ. पट्टेबहादूर यांना व उत्कृष्ट राष्ट्रीय सेवा योजना युनिट म्हणून बाळासाहेब देसाई महाविद्यालयास जिल्हास्तरीय पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी डॉ. भरत जाधव, प्रा. लक्ष्मण गणगे, प्रा. विशाल कांबळे, प्रा. श्रीगणेश गायकवाड उपस्थित होते. डॉ. जी. एस. पट्टेबहादूर हे सलग पाच वर्षे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी म्हणून कार्यरत आहेत. ते जिल्हा विभागीय समन्वयकही आहेत. त्यांनी आव्हान शिबिरामध्ये शिवाजी विद्यापीठास प्रथम क्रमांकाचे पारितोषिकही मिळवून दिले आहे.

या यशाबद्दल माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर, जिल्हा बँकचे संचालक सत्यजितसिंह पाटणकर, कोयना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. सोपानराव चव्हाण, उपाध्यक्ष प्रकाशभाऊ पाटील, जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर, संचालक संजीव चव्हाण, याज्ञसेन पाटणकर, प्राचार्य डॉ. एस. डी. पवार, अधीक्षक विजय काटे यांच्यासह प्राध्यापक यांनी अभिनंदन केले.



कोल्हापूर : बाळासाहेब देसाई महाविद्यालय व डॉ. जी. एस. पट्टेबहादूर यांना सन्मानित करताना मान्यवर.